VOL- XII | ISSUE- II | FEBRUARY | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षण

**डॉ. चरणदास युवराज कांबळे**
सहयोगी प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी

**प्रस्तावना:**

'शाश्वत विकास' हा शब्दप्रयोग विश्व पर्यावरण विकास आयोग म्हणजेच 'बर्टलँड' आयोगाने १९८७ मध्ये पहिल्यांदा वापरला आहे. या आयोगाच्या मते, सध्याच्या पिढीला गरजांची पूर्तता पुढील पिढीच्या गरजा भागविण्यासाठीच्या क्षमता अबाधित राखून करणे म्हणजे, शाश्वत विकास होय. काहींनी 'धारणाक्षम विकास' किंवा 'प्रतिपालनिय विकास' असाही शाश्वत विकासाचा अर्थ लावलेला आहे; मात्र शाश्वत विकासाची संकल्पना ही प्रथम संयुक्त राष्ट्राच्या 'पर्यावरण व विकास' या १९९२ च्या विश्व पर्यावरण विकास आयोगाने रीओ दे जानेरो येथील वसुंधरा परिषदेत मांडली. ज्यामध्ये शाश्वत विकास म्हणजे, 'असा विकास की, ज्यात वर्तमान काळातील विकासासाठीच्या गरजा भागविताना भावी पिढीच्या विकासाच्या क्षमतांशी तडजोड न करणे होय.' थोडक्यात, आपल्या विकासाच्या परिणामाची फार मोठी किंमत पुढील पिढीला मोजावी लागू नये, विकास करीत असताना लागणारे घटक योग्य प्रमाणात वापरून जतन करून संवर्धन करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

विकास या शब्दाचा अर्थ व अन्वयार्थ जीवनशैलीची उत्तरोत्तर प्रगती होणे असा आहे. शिक्षण, आरोग्य, निसर्ग या घटकांचा यात मोठा हातभार असतो. शिक्षण हे भविष्यातील जगाला तसेच व्यक्ती व समाजाला ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने काम करण्यास प्रवृत्त करणारे एक महत्त्वाचे माध्यम आहे. या दृष्टीने १९९२ च्या रीओ दे जानेरो येथील परिषदेत शाश्वत विकासासाठी शिक्षणाचा चार अंगानी विचार करण्यात आला. एक, मूलभूत शिक्षणाचे उन्नयन व सुधारणा; दोन, शाश्वत विकासासाठी सर्व स्तरावरील शिक्षणाची पुनर्रचना; तीन, शाश्वत विकासाबाबत जनसामान्यामध्ये जाणीव जागृती व सामंजस्याचा विकास आणि चार, प्रशिक्षण होय. यासाठी उच्च शिक्षण देणाऱ्या प्रत्येक घटकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**उच्च शिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत विकासाची संकल्पना :**

संयुक्त राष्ट्राच्या २०१२ मधील रीओ दे जानेरो येथे पार पडलेल्या परिषदेमध्ये शाश्वत विकासाची सुमारे १७ उद्दिष्टे ठरविण्यात आली आणि ती सप्टेंबर २०१५ मध्ये पार पडलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेत अधिकृतपणे मान्य करण्यात आली. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी २०१६ ते २०३० असा १५ वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला. यामध्ये सर्वांसाठी समावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करणे आणि आजीवन शिक्षणाला प्रोत्साहन देणे, हे शैक्षणिक उद्दिष्ट महत्त्वाचे असून या उद्दिष्टांतर्गत एकूण दहा विविध लक्ष्ये ठरविण्यात आली. त्यामध्ये २०३० पर्यंत सर्व स्त्री-पुरुषांना परवडणारे व गुणवत्तापूर्ण असे तंत्र, व्यावसायिक आणि विद्यापीठ स्तरावरील शिक्षण सुनिश्चित करणे; रोजगार व उद्योजकतेसाठी आवश्यक तांत्रिक व व्यावसायिक कौशल्य असलेले तरुण आणि प्रौढांच्या संख्येत लक्षणीय वाढ करणे; लिंग असमानता दूर करून समाजातील प्रत्येक असुरक्षित व्यक्तीला सर्व प्रकारचे शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणात समान प्रवेश-संधी सुनिश्चित करणे या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा समावेश होतो.

**उच्च शिक्षणासाठी शाश्वत विकास** (Sustainable Development for Higher Education) म्हणजे शिक्षण प्रक्रियेत शाश्वत विकासाचे तत्त्वज्ञान (principles) आणि ध्येये (goals) समाविष्ट करणे, जेणेकरून शिक्षण केवळ ज्ञान देण्यापलीकडे जाऊन, शाश्वत भविष्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमता आणि मूल्यांचा विकास करेल.

**शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षणाची भूमिका**

**पर्यावरणपूरक शिक्षण:**

उच्च शिक्षण संस्थांनी हवामान बदल, प्रदूषण, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर यांसारख्या पर्यावरणीय समस्यांवर

लक्ष केंद्रित करणारे अभ्यासक्रम आणि संशोधन कार्यक्रम सुरू करावेत.

**सामाजिक न्याय:**

शिक्षण प्रक्रियेत सामाजिक समानता, गरीब आणि वंचित घटकांना संधी, आणि समावेशकता यावर भर दिला पाहिजे.

**आर्थिक विकास:**

उच्च शिक्षणाने उद्योजकता आणि कौशल्य विकासाला प्रोत्साहन देऊन, शाश्वत अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ तयार करावे.

**जागरूक नागरिक:**

शाश्वत विकासासाठी शिक्षणामुळे लोकांना जागतिक समस्या आणि त्यांच्या उपायांबद्दल जागरूक करणे आवश्यक आहे.

**संशोधन आणि नविनता:**

उच्च शिक्षण संस्थांनी शाश्वत विकासाशी संबंधित समस्यांवर संशोधन करून, नविन तंत्रज्ञान आणि उपायांची निर्मिती करावी.

**शाश्वत विकास ध्येये (SDGs):**

उच्च शिक्षण संस्थांनी संयुक्त राष्ट्रांनी निश्चित केलेल्या 17 शाश्वत विकास ध्येयांनुसार (SDGs) काम करावे, जसे की गरीब लोकांना मदत करणे, शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे, आणि नैसर्गिक संसाधनांची काळजी घेणे.

**शाश्वत विकासासाठी शिक्षण घेत असताना अभ्यासक्रमातील मुलभूत घटक**

(१) स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही लोकशाही मूल्ये असावित.

(२) प्राथमिक ते उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमांमध्ये पर्यावरण शिक्षण सक्तिचे असावे.

(३) अभ्यासक्रमात प्रत्येक नागरिकाचे हक्क, कर्तव्य व जबाबदारी असणारे घटक असावे.

(४) त्यात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश असावा.

(५) भाषा, विज्ञान, भूगोल, नागरिकशास्त्र इत्यादी विषयांचा शाश्वत विकासामध्ये मोलाचे स्थान असल्याबाबत अभ्यासक्रमात नमुद असावे.

(६) संपूर्ण जगाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीबाबत सद्यस्थितीची माहिती अभ्यासक्रमात असावी. (७) समानता व बंधुता यांबाबत माहिती असावी.

**ESD मध्ये शैक्षणिक दृष्टिकोन**

शाश्वत शिक्षणासाठी 'योग्य' अध्यापनशास्त्र नाही, परंतु त्यासाठी सक्रिय, सहभागी आणि अनुभवात्मक शिक्षण पद्धतींकडे वळण्याची आवश्यकता आहे ज्या शिकणाऱ्याला गुंतवून ठेवतील आणि त्यांच्या समजुती, विचार आणि कृती करण्याच्या क्षमतेत खरा फरक करतील यावर व्यापक एकमत आहे.

तज्ञांनी अध्यापनशास्त्रीय घटक ओळखले आहेत जे प्लायमाउथमधील कर्मचारी शिक्षण वातावरणात या घटकांना आणण्यासाठी वापरू शकतील अशा अनेक शैक्षणिक दृष्टिकोनांचा किंवा पद्धतींचा समावेश करतात.

१. **समीक्षात्मक चिंतन** - ज्यामध्ये पारंपारिक व्याख्यानांचा समावेश आहे, परंतु नवीन दृष्टिकोन जसे की रिफ्लेक्सिव्ह अकाउंट्स, लर्निंग जर्नल्स आणि चर्चा गट.

२. **पद्धतशीर विचार आणि विश्लेषण** - वास्तविक-जगातील केस स्टडीज आणि गंभीर घटनांचा वापर, प्रकल्प-आधारित शिक्षण, उत्तेजक क्रियाकलाप आणि कॅम्पसचा शिक्षण संसाधन म्हणून वापर.

३. **सहभागी शिक्षण** - गट किंवा समवयस्क शिक्षण, संवाद विकसित करणे, अनुभवात्मक शिक्षण, कृती संशोधन/कृती शिकणे आणि स्थानिक समुदाय गट आणि व्यवसायांसह केस स्टडी विकसित करणे यावर भर दिला जातो.

४. **भविष्यातील परिस्थितींसाठी सर्जनशील विचार करणे** - भूमिका बजावणे, वास्तविक जगाची चौकशी, भविष्याचे दर्शन, समस्या-आधारित शिक्षण आणि उदयासाठी जागा प्रदान करून.

५. **सहयोगी शिक्षण** - ज्यामध्ये अतिथी वक्त्यांचे योगदान, कार्य-आधारित शिक्षण, आंतरविद्याशाखीय/बहुविद्याशाखीय कार्य आणि सहयोगी शिक्षण आणि सह-चौकशी यांचा समावेश आहे.

**समारोप :**

आजच्या युगाला डिजिटल युग म्हणून संबोधले जाते या डिजिटल युगात शाश्वत विकासाचे महत्व व गरज लक्षात घेवून उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम, कौशल्य विकास, शिक्षक भूमिका, या बाबी अतंत्य महत्वाच्या आहेत. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या शाश्वत विकासाची

VOL- XII ISSUE- II FEBRUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

संकल्पना अधिक बळकट होण्याची अपेक्षा आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये 2030 च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे.शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र,बहू शाखीय,21 व्या शतकाच्या गरजाना अनुरूप करत भारताचे चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या आगळ्या क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. यामुळे उच्च शिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी सर्व घटकांचे योगदान महत्वाचे आहे.

**संदर्भ सूची:**


- शिक्षण आणि शाश्वत विकास retrieve from https://www.developmenteducationreview.com/issue/issue-6/education-and-sustainable-development
- युनेस्को, २०१४. शाश्वत विकासासाठी शिक्षण (ESD) retrieve from https://www.plymouth.ac.uk/students-and-family/sustainability/sustainability-education/esd
- अतासी, मोहंती. २०२५ शाश्वत विकासासाठी शिक्षण retrieve from https://onlinecourses.nptel.ac.in/noc25_hs12/preview